SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000
E-mail address- affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
East:1962
NAAC 'A' Grade
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)

जा.क्र. शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी.१/प्रशांत/ १८१६ दिनांक : २०/७/२०२०

प्रति,

मा.प्राचार्य / संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये/शिक्षण संस्था

विषय :- महाविद्यालयातील उपस्थितीबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे जा.क्र आस्थापना/११८९ दिनांक १९ जुलै २०२० रोजीचे परिपत्रक

२) या कार्यालयाचे जा.क्र.शिवाजी वि./संलग्नता टी-१/प्रशांत/१७२९/११८८ दि. ८ जुलै रोजीचे पत्र.

३) या कार्यालयाचे जा.क्र.शिवाजी/संलग्नता टी-१/प्रशांत /१६८५/१४५९ दिनांक २ जुलै २०२० रोजीचे पत्र.

४) सचिव ,श्री अमित खरे मानव संसाधन विकास मंत्रालय उच्चतर शिक्षा विभाग नवी दिल्ली यांचे जा.क्र No.१६/-६/२०२०-U१A दिनांक ३० जून २०२० रोजीचे पत्र.

५) डॉ.धनराज माने शिक्षण संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य यांचे क्रमांक-उशिसं/२०२०/कोरोना/मवि-१/४५२९ दिनांक ३० जून २०२० रोजीचे पत्र.

६) महाराष्ट्र शासन महसूल व वन आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन विभाग आदेश क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1,Dated 29 June 2020

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाबाबत आपणास आदेशानुसार कळविण्यात येते की, कोरोनाचा प्रादूर्भाव वाढला असल्यामुळे स्थानिक प्रशासना मार्फत (जिल्हाधिकारी) घेतलेल्या/घेण्यात येणा-या निर्णयानुसार महाविद्यालये/ संस्था बंद ठेवण्याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घेण्याबाबत आपणास संदर्भिय पत्र क्रमांक २ नुसार कळविण्यात आले होते.

तथापी, महाविद्यालयामधील कामकाजासाठी आवश्यकतेनुसार आपल्या स्तरावर संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित राहण्याबाबत सूचीत करावे. उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून (Work from Home) महाविद्यालयीन कामकाज करावे.

महाविद्यालयामध्ये उपस्थित राहणा-या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनाचे काटेकोरपणे पालन करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

डॉ.व्ही.डी.नांदवडेकर
कुलसचिव